**आर्ट वर्कशॉप अहवाल दिनांक ०७/०२/२०२५ आणि ०८/०२/२५**

शुक्रवार व शनिवार दिनांक ०७/०२/२०२५आणि०८/०२/२५ रोजी महाविद्यालयात **आर्ट वर्कशॉप** घेण्यात आले. ह्या वर्कशॉप साठी पिडी लाईट प्रशिक्षित कला तज्ञ आणि कला **प्रेमी श्रीमती अर्चना जाधव ह्यांना प्रशिक्षक** म्हणून आमंत्रित केले गेले होते. दोन्ही दिवस हा कार्यक्रम साडेदहा ते चार वाजेपर्यंत डॉ. हेडगेवार सभागृहात पार पडला. ही **कार्यशाळा एफ वाय बी एड मधील विद्यार्थी - शिक्षक तसेच ज्यांना कलेमध्ये रस असेल त्यांच्यासाठी खुली होती.**

अर्चना जाधव यांनी विद्यार्थ्यांना टाय अँड डाय, कॅनव्हास बॅग बनवून (environment friendly product) त्यावर पेंटिंग करणे तसेच मोल्डच्या (एकप्रकारची माती) साहयाने अध्यापन साधन निर्मिती करणे ह्या गोष्टी शिकवल्या. ह्या सर्व उपक्रमासाठी कलेचे संपूर्ण साहित्य आम्हाला महाविद्यालयातर्फे मोफत दिले गेले.

**उपक्रम 1.** अर्चना मॅमनी आम्हाला टाय अँड डाय यामध्ये रुमालाला वेगवेगळ्या प्रकारे बांधून किंवा पॅटर्न करून त्याला कशाप्रकारे रंग दिल्याने कोणत्या प्रकारची डिझाईन किंवा बाटिक पॅटर्न तयार होईल याबद्दल सांगितले. त्यानुसार सर्व सहभागी विद्यार्थ्यांनी तशाप्रकारे सुंदर असे वेगवेगळ्या पद्धतीचे रुमाल तयार केले. हा भाग खूपच रोचक होता कारण विशिष्ट प्रकारे रुमाल बांधून नंतर उमलणारी नक्षी आश्चर्यचकित करणारी होती.

**उपक्रम २.** त्यानंतर आम्हाला विदाऊट स्टिचिंग कापडी पिशवी (टोट बॅग) क्रमाक्रमाने बनवण्यास शिकवली. ग्लूच्या सहाय्याने बॅग चिकटवून त्यावर सुंदर सुंदर डिझाइन्स आम्ही तयार केल्या. अतिशय उपयुक्त आणि पर्यावरण प्रेमी असा हा उपक्रम बेस्ट आऊट ऑफ वेस्ट धरतीवर आखता येईल हे आम्हांला लक्षात आले.

**उपक्रम 3.** मोल्ड इट (Mould it) चा वापर करून त्यापासून शैक्षणिक संसाधन म्हणून शरीराचे अवयव उदाहरणार्थ हृदय, किडनी इत्यादी बनवण्यास शिकवले, ज्याचा उपयोग आम्हाला प्रत्यक्ष वर्गात पदोपदी होईल.

**सदर कार्यशाळेची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे:**

1. नाविन्यपूर्ण शिक्षण संसाधनांसाठी कलेच्या जगाचा शोध घेणे.
2. सर्जनशील कला प्रकल्पांद्वारे समस्या सोडविण्याच्या कौशल्यांचा विकास करणे.
3. शिक्षणाची आणि आत्मअभिव्यक्तीची आवड वाढवणे.
4. आपल्या कलात्मक क्षमतांबद्दल आत्मविश्वास निर्माण करणे.
5. शिकण्याच्या प्रक्रियेला समृद्ध करण्यासाठी नवीन तंत्रे आणि माध्यमे शोधून काढणे.

विद्यार्थ्यांनी यात स्वेच्छेने सहभागी होऊन आपापले कौशल्य आणि सर्जनशीलता यांचा प्रत्यक्ष विकास अनुभवला.

अशाप्रकारे श्रीमती अर्चना जाधव आणि समन्वयक श्रीमती स्मिता गणात्रा यांच्या मार्गदर्शनाखाली ही कार्यशाळा आनंदाने पार पडली.

अहवाल लेखन : कु.प्राजक्ता सुर्वे, F.Y. B.Ed

कार्यशाळेची झलक:

**Kit distribution**







**Demonstration begins…**





**Nothing matches the pleasure of hands-on experience!**











**Proud display of the work…**
















vivo T3 5G
02/08/2025, 14:10



